ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

## “चर्चा म्हणजे शरणागती नव्हे!” इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा अमेरिकेला इशारा



महाईन्यूज™



पान 2 वरुन...

पुणेकरांना दिलासा; मंगलोरसाठी थेट विमानसेवा

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 11 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### पश्चिम आशियातील संकटानंतर पंतप्रधान मोदींचे आवाहन

# 'इंधन जपून वापरा..!'



**महाईन्यूज | हैदराबाद**

**पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. “आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा,” असे आवाहन त्यांनी रविवारी केले. हैदराबाद येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले.**




पंतप्रधान म्हणाले की, “आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. यामुळे केवळ परकीय चलन वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल.”

सुमारे १,७०० कोटी रुपये खर्चून उभारलेले हे देशातील पहिले पूर्णतः कार्यरत ‘पीएम मित्रा पार्क’ आहे. केंद्राच्या ‘5F’ व्हिजन (FARM TO FIBRE TO FACTORY TO FASHION TO FOREIGN) अंतर्गत हे पार्क कापूस उत्पादक शेतकऱ्यांपासून ते निर्यातीपर्यंतची संपूर्ण साखळी मजबूत करेल, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल. ही काकतिया मेगा टेक्सटाइल पार्कची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. पंतप्रधानांनी या माध्यमातून केवळ ऊर्जा बचतीचा मंत्र दिला नाही, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी पायाभूत सुविधांचे महत्त्वही अधोरेखित केले.

## पर्यायी ऊर्जेसाठी भारताचे पाऊल



पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या वाढत्या ऊर्जा सामर्थ्याचाही उल्लेख केला. भारत आज सौर ऊर्जा निर्मितीत जगात आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पुढील पावले उचलली आहेत. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या प्रमाणात मोठी वाढ करण्यात आली आहे. उज्ज्वला योजनेद्वारे गॅस कनेक्शन दिल्यानंतर आता स्वस्त पाइप गॅस पुरवठ्यावर भर दिला जात आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वस्त इंधनासाठी सीएनजी जाळ्याचा विस्तार केला जात आहे.

## इंधन बचतीवर भर का?

सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या ‘होर्मुझची सामुद्रधुनी’ (STRAIT OF HORMUZ) बंद झाल्याने भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## तेलंगणाला विकासकामांची भेट

पंतप्रधानांनी या दौऱ्यात अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण केले. यामध्ये काझीपेट-विजयवाडा रेल्वे मार्ग, हैदराबादमधील नवीन पेट्रोलियम टर्मिनल आणि वारंगल येथील ‘पीएम मित्रा पार्क’ (काकतिया मेगा टेक्सटाइल पार्क) चा समावेश आहे.






> “इंधन बचत हीच आजची देशसेवा आहे; प्रत्येकाने जबाबदारीने वापर करावा.”
>
> — नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# पुणेकरांना दिलासा; मंगलोरसाठी थेट विमानसेवा

## दक्षिण भारत प्रवास होणार जलद; पुणे विमानतळ प्रशासनाचे नियोजन अंतिम टप्प्यात

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्याहून कर्नाटकच्या किनारपट्टीवरील महत्त्वाचे शहर असलेल्या मंगलोर (मंगळुरू) साठी लवकरच थेट विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन पुणे विमानतळ प्रशासनाकडून सुरू आहे. 1 जून रोजी ही नवीन विमानसेवा सुरू होण्याची शक्यता असून, या विमानसेवेमुळे पुणेकरांसाठी आणि विशेषतः दक्षिण भारतात वारंवार प्रवास करणाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.**



उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर विमानतळावरील स्लॉटमध्ये (विमानांच्या येण्या-जाण्याच्या वेळा) वाढ करण्यात आली आहे. यामुळे नवीन मार्ग सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने 1 जूनपासून मंगलोर शहरासाठी ही सेवा प्रत्यक्ष सुरू करण्याच्या हालचाली विमानतळ प्रशासनाकडून सुरू झाल्या आहेत.

सध्या पुणे ते मंगलोर प्रवासासाठी प्रवाशांना रेल्वे किंवा खासगी बसवर अवलंबून राहावे लागते, त्यासाठी 10 ते 15 तासांचा वेळ लागतो. थेट विमानसेवा सुरू झाल्यामुळे हा प्रवास अवघ्या दीड ते दोन तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे व्यापारी, पर्यटक आणि कामानिमित्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

मंगलोर हे फक्त एक शहर नसून, कर्नाटकच्या किनारपट्टीवरील एक प्रमुख औद्योगिक आणि व्यापारी केंद्र आहे. मंगलोर हे कर्नाटकचे एकमेव असे शहर आहे, जिथे हवाई, रस्ते, रेल्वे आणि सागरी (बंदर) अशा चारही प्रकारच्या वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. येथे प्रामुख्याने तुलू, कन्नड, कोकणी आणि बेअरी भाषा बोलल्या जातात.

अरबी समुद्र आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले हे शहर पर्यटनासाठीही प्रसिद्ध आहे. प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता, उन्हाळी वेळापत्रकात नवीन विमान सेवांना परवानगी दिली आहे. त्यानुसार मंगलोरसाठी नवीन सेवा सुरू करण्याचे आमच्याकडून नियोजन सुरू आहे, असे पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी सांगितले.

### थेट उड्डाणाने मोठा दिलासा

पुणे-मंगलोर थेट विमानसेवा सुरू झाल्यास प्रवाशांचा 10 ते 15 तासांचा प्रवास अवघ्या दीड ते दोन तासांत पूर्ण होणार आहे. त्यामुळे व्यापारी, पर्यटक आणि कामानिमित्त प्रवास करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, दक्षिण भारताशी कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे.

# डिंभे धरणातील पाणीपातळी घटली; वाढत्या उष्णतेमुळे पाणीटंचाईचा धोका

**महाईन्यूज । पुणे**

**वाढते तापमान तसेच उन्हाळी आवर्तनामुळे आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणाच्या पाणीसाठ्यात दिवसेंदिवस घट होत चालली आहे. सध्या धरणात 20.81 टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, गतवर्षी याच कालावधीत 10.98 टक्के पाणीसाठा होता. यंदा तुलनेने पाणीसाठा अधिक असला तरी वाढत्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असल्याने धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे.**



> “उपलब्ध पाणी-साठा मर्यादित असून, वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढले आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून ठिबक सिंचनास प्राधान्य द्यावे.
>
> - गणेश नान्नोर, कार्यकारी अभियंता, कुकडी प्रकल्प

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अनेक भागांतील शेतकरी खरीपपूर्व पिके तसेच भाजीपाला टिकवण्यासाठी धडपड करीत आहेत. पाण्याअभावी जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, डाव्या कालव्यास सुमारे सहाशे क्यूसेक पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात शेतीला दिलासा मिळत असला तरी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे कुकडी प्रकल्पाचे अधिकारी दत्ता कोकणे यांनी सांगितले. जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांना पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे. ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर वाढवून कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यावर भर देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. आगामी काळात पावसाळा लांबल्यास पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते.



# निरा-बारामती रस्त्याचे काम धुळीच्या विळख्यात

**महाईन्यूज । पुणे**

निरा-बारामती राज्यमार्गाच्या रुंदीकरणाचे काम सध्या सुरू असले, तरी कामामध्ये सुरक्षेच्या नियमांचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. रस्त्यावर नियमित पाणी मारले जात नसल्याने धुळीचे प्रचंड लोट उडत आहेत. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. धुळीमुळे समोरचे वाहन दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. मात्र, संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या मिलिभगतीमुळे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे.

रस्त्याच्या कामासाठी ठिकठिकाणी खड्डे खोदण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी योग्य दिशादर्शक फलक, रात्री परावर्तीत होणारे सिग्नल किंवा सुरक्षा बॅरिकेड्स नसल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. श्वसनाचे त्रास वाढत असल्याच्या तक्रारी आहेत. दरम्यान, या चौपदरी-करणासाठी अनेक मोठ्या झाडांची कत्तल करण्यात आल्याने पालखीमार्गावरील सावली नाहीशी झाली आहे. संत सोपानदेव पालखी सोहळा दरवर्षी या मार्गाने पंढरपूरकडे मार्गस्थ होत असतो. मात्र, यंदा वारकऱ्यांना उन्हात आणि धुळीच्या वातावरणात प्रवास करावा लागणार आहे. पूर्वी या मार्गावर वड, पिंपळ, जांभूळ आणि लिंब यांसारखी मोठी व सावली देणारी झाडे होती. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून सुरू असलेल्या कामांमुळे संपूर्ण मार्ग उजाड आणि भकास झाल्याचे चित्र आहे. प्रशासनाकडून वृक्षारोपण करण्यात आले असले, तरी योग्य देखभालीअभावी अनेक रोपे वाळून गेली आहेत. वाहनचालक आणि नागरिकांनी प्रशासनाने तातडीने रस्त्यावर नियमित पाणी मारणे, सुरक्षेची उपाययोजना करणे, धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावणे, अशी मागणी केली आहे.

# भाजपमध्ये संघटना सर्वोच्च; भरतजी पाटील यांचा ठाम संदेश

## मोरवाडीतील बैठकीत शहर संघटनेचा आढावा, निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**“राजकारणात काम करत असताना पक्ष संघटना ही नेहमी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा मोठी असते. प्रत्येक कार्यकर्त्याने ही भावना मनाशी पक्की बाळगली पाहिजे, कारण भारतीय जनता पक्षात संघटनेपेक्षा श्रेष्ठ या जगात कोणीही नाही,” असे ठाम प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त शहर प्रभारी अॅड. श्री भरतजी पाटील यांनी केले.**




मोरवाडी येथील पक्ष कार्यालयात आयोजित पिंपरी-चिंचवड शहराच्या महत्त्वपूर्ण संघटनात्मक आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अॅड. पाटील यांची प्रभारीपदी नियुक्ती केल्यानंतर आगामी पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ताकद वाढवण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

या बैठकीला शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस अॅड. मोरेश्वर शेडगे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, दिनेश यादव यांसह सर्व जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चे, आघाडी, सेल, प्रकोष्ठ आणि मंडल अध्यक्ष-सरचिटणीस उपस्थित होते. या बैठकीत अॅड. भरत पाटील यांनी शहरातील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पक्ष बळकटीकरणावर विशेष भर दिला.

याप्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार गोरखे यांनी देखील उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शत्रुघ्न काटे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आम्ही जनसेवेचे व्रत घेतले आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासोबतच, सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्षाची ध्येयधोरणे घराघरांत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कार्यकर्त्यांचे कष्ट आणि जनतेचा विश्वास हीच आपली खरी ताकद असून आगामी काळात पक्ष संघटना अधिक गतिमान करण्यावर आमचा भर असेल. मोरवाडी येथील शहर भाजपा मध्यवर्ती कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या तयारीला या निमित्ताने वेग आला आहे.

### संघटनाच ताकद

भाजपमध्ये वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा संघटनेला सर्वोच्च स्थान असून, कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे पक्ष बळकटीसाठी काम करणे गरजेचे आहे, असा ठाम संदेश भरतजी पाटील यांनी मोरवाडी येथील आढावा बैठकीत दिला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी जनसंपर्क वाढवून पक्षाची ताकद अधिक मजबूत करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# मोशी-चिखलीत एमएनजीएल पाईपलाईन रखडली; नागरिक त्रस्त

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**शहरात एलपीजी गॅसला पर्याय म्हणून महाराष्ट्र नॅशनल गॅस लिमिटेडच्या (एमएनजीएल) वतीने भूमिगत वाहिनीचे जाळे विस्तारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र, चिखली आणि मोशी परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये हे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.**

> गेल्या 4 वर्षांपासून आम्ही गॅस पाईपलाईनच्या प्रतीक्षेत आहोत. सोसायट्यांत पाईपलाईन टाकून 4 वर्षे झाली. मात्र, मुख्य वाहिनी नसल्याने ही केवळ शोभेची वस्तू झाली आहे. प्रशासनाने हे काम तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे. - **प्रतिभा चौधरी, गृहिणी**



> आजच्या गॅसटंचाईचा नागरिकांना त्रास झाला नसता जर वेळेत जोडणीकामे झाली असती, तर या कामासाठी आमचाही पाठपुरावा सुरू आहे. काही ठिकाणी खोदकामे केली आहेत. काही ठिकाणी लाईन पूर्ण झाली; मात्र मुख्य लाईन जोडली नसल्याने गॅसपुरवठा नाही. अशा अनेक तक्रारी आहेत. मोजक्याच ठिकाणी म्हणजेच स्पाईन सिटी, प्रभाग 6 मोशी प्राधिकरण ठिकाणी कामकाज झाल्याचे दिसते, पण बाकी ठिकाणी कामे रखडलेली आहेत. लवकरात-लवकर ही कामे मार्गी लागणे आवश्यक आहे. - **सुजाता बोराटे, नगरसेविका**

विशेष म्हणजे, अनेक सोसायट्यांच्या अंतर्गत भागात पाईपलाईन टाकून चार वर्षे उलटली तरी मुख्य वाहिनीशी जोडणी न झाल्याने या वाहिन्या केवळ शोभेच्या वस्तू ठरत आहेत. यामुळे आजच्या गॅसटंचाईच्या काळातही नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असून, सिलिंडरसाठी रांगा लावण्याची वेळ आली आहे. चिखली-मोशी परिसरातील रहिवाशांच्या मते, एमएनजीएलच्या अधिकाऱ्यांकडून तांत्रिक अडचणीचे कारण सांगून केवळ वेळकाढूपणा केला जात आहे.

अनेक ठिकाणी खोदकाम करून इमारतींच्या परिसरात गॅस वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, परंतु मुख्य वाहिनीचा पुरवठा अद्याप जोडलेला नाही. चिखली परिसरातील कृष्णानगर, पाटीलनगर यांसारख्या भागांत ड्रेनेज आणि रस्त्यांच्या कामांमुळे आधीच रस्ते उखडलेले असताना, गॅस वाहिनीच्या अर्धवट कामामुळे पदपथाचीही दुरवस्था झाली आहे. पावसामुळे या कामात अधिक अडथळे येत असून, खोदलेल्या ठिकाणी राडारोडा



तसाच पडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. मोशीतील काही सोसायट्यांमध्ये 70 ते 80 टक्के घरांपर्यंत गॅस पोहोचला असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला तरी, अद्याप 30 टक्क्यांहून अधिक कुटुंब या सुविधेपासून वंचित आहेत.

### पालिकेच्या कामांमुळे कामात अडथळा

चिखली-मोशी भागातील जवळपास 60 ते 70 टक्के कामे पूर्ण झाली असून, काही ठिकाणी महापालिकेची विकासकामे सुरू असल्यामुळे तांत्रिक अडचणी येत असल्याचे एमएनजीएल अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. येत्या दीड-दोन महिन्यांत या कामाला गती देऊन प्रलंबित जोडण्या पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन जिथे रस्त्यांचे नुकसान झाले आहे. तिथे दुरुस्तीचे कामही लवकरच हाती घेतले जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली आहे.




# कॅसिनोंच्या झगमगाटामागील वास्तव

**गोवा हे राज्य आपल्या निसर्गसौंदर्य, समुद्रकिनारे आणि समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी ओळखले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांत पर्यटनाच्या नावाखाली वाढलेल्या कॅसिनो उद्योगामुळे या ओळखीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. विशेषतः पणजी आणि मांडवी नदी परिसरात कॅसिनोंचा वाढता प्रभाव स्थानिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.**




कॅसिनो उद्योगामुळे राज्याला मोठ्या प्रमाणावर महसूल आणि रोजगार मिळत असल्याचे मान्य करावे लागेल. देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यात या उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, या आर्थिक फायद्याच्या बदल्यात स्थानिक नागरिकांना मोठी किंमत मोजावी लागत आहे. रात्रीच्या वेळी पणजीतील रस्त्यांवर होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, पार्किंगची अपुरी व्यवस्था आणि वाढती गर्दी यामुळे स्थानिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

याशिवाय, कॅसिनोंच्या वाढत्या संख्येमुळे सामाजिक आणि सांस्कृतिक बदलही जाणवू लागले आहेत. गोव्याची पारंपरिक शांतता, साधेपणा आणि स्थानिक संस्कृती यावर या चमकदार नाईट लाईफचा परिणाम होत आहे. पर्यटन विकासाचा उद्देश स्थानिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे असतो; मात्र, जेव्हा तोच विकास त्यांच्या अडचणींचे कारण ठरतो, तेव्हा त्याचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही ही परिस्थिती गंभीर आहे. मांडवी नदीत उभ्या असलेल्या कॅसिनो जहाजांमुळे जलप्रदूषण वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. जहाजांमधून बाहेर पडणारे सांडपाणी, कचरा आणि रासायनिक घटक नदीच्या पाण्यात मिसळत असल्याने जलजीवांवर आणि जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत आहे. न्यायालयानेही या प्रकरणाची दखल घेत तपासणीचे आदेश दिले आहेत, यावरून समस्येची तीव्रता स्पष्ट होते.

या पार्श्वभूमीवर मांडवी नदीत आणखी एक मोठे कॅसिनो जहाज आणण्याचा प्रस्ताव समोर येत आहे, ही बाब अधिक चिंताजनक आहे. आधीच नदीतील जागेवर ताण निर्माण झाला असताना नवीन जहाजामुळे परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे. नदीचा नैसर्गिक प्रवाह, सौंदर्य आणि पर्यावरणीय संतुलन धोक्यात येऊ शकते. कॅसिनोंविरोधात स्थानिकांनी अनेकदा आवाज उठवला आहे. आंदोलने, निवेदने आणि राजकीय आश्वासने यानंतरही ठोस बदल दिसून येत नाहीत. यावरून कॅसिनो उद्योगामागील आर्थिक आणि राजकीय प्रभाव किती मजबूत आहे, हे स्पष्ट होते.

गोव्याचा खरा आत्मा त्याच्या निसर्गात, संस्कृतीत आणि लोकांच्या साधेपणात आहे. केवळ आर्थिक फायद्यासाठी या मूल्यांचा त्याग करणे दीर्घकालीन दृष्टीने घातक ठरू शकते. त्यामुळे कॅसिनो उद्योगाकडे केवळ महसुलाचे साधन म्हणून न पाहता, त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय परिणामांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. संतुलित आणि शाश्वत विकासाचाच मार्ग गोव्याच्या भविष्यासाठी योग्य ठरेल.

## प्रासंगिक »

### महिलेचा निर्भीडपणा

**खलिफा उमर यांना एकदा जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांनी प्रभावी भाषण केले आणि लोकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.**

भाषणाच्या शेवटी त्यांनी विचारले, “मी तुम्हाला एखादा आदेश दिला तर तो पाळाल का?” अनेकांनी होकार दिला; पण एका महिलेनं ठामपणे “नाही” असे उत्तर दिले.

सभेत कुजबुज सुरू झाली, पण खलिफांनी तिला शांतपणे कारण विचारले. ती म्हणाली, “तुमचा पायजमा इतरांपेक्षा जास्त कापडाचा दिसतो. यावरून तुम्ही शाही भांडारातून जास्त घेतले असावे.” खलिफांनी संताप न करता आपल्या मुलाला बोलावले.

मुलाने स्पष्ट केले की त्याने स्वतःच्या वाट्याचे कापड वडिलांना दिले होते. त्यामुळे गैरसमज दूर झाला. हे ऐकून महिला समाधानी झाली. खलिफा उमर यांनी तिचे आभार मानले आणि म्हणाले, “जोपर्यंत जनता निर्भीडपणे प्रश्न विचारते, तोपर्यंत राज्य सुरक्षित राहते.”

- तात्पर्य : **सत्तेपेक्षा सत्य मोठे; निर्भीडपणा समाजाचे रक्षण करतो.**

महाराष्ट्रातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता एक मूलभूत प्रश्न उभा राहतो-राज्यात खऱ्या अर्थाने विरोधी पक्ष अस्तित्वात आहे का?

# विरोधी पक्ष दिसला तर लाखाचे बक्षीस द्यायचे का?



विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही ठिकाणी अधिकृत विरोधी पक्षनेते नसल्यामुळे लोकशाहीच्या संतुलनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लोकशाही व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधकांचे असते; मात्र सध्याच्या परिस्थितीत हे कार्य कोणीच प्रभावीपणे करताना दिसत नाही.

विरोधी पक्षातील प्रमुख नेते सरकारवर टीका करताना दिसतात, पण ती टीका सुसंगत, ठोस आणि पुराव्यांवर आधारित असल्याचे फारसे जाणवत नाही. विजय वडेट्टीवार, नाना पटोले किंवा हर्षवर्धन सपकाळ यांसारख्या नेत्यांची वक्तव्ये अनेकदा केवळ आरोपांपुरती मर्यादित राहतात. सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात; मात्र त्यामागे ठोस पुरावे मांडले जात नाहीत. त्यामुळे विरोधकांची भूमिका केवळ औपचारिक वाटू लागते. दुसरीकडे, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतही स्पष्ट विरोधाची धार कमी झालेली दिसते. सुप्रिया सुळे काही प्रमाणात सरकारवर टीका करताना दिसतात; मात्र इतर नेत्यांची भूमिका शांत किंवा संदिग्ध आहे. शिवसेनेच्या गटांमध्येही विरोधीपक्षे अंतर्गत राजकारण अधिक ठळकपणे दिसते. विरोधी पक्षनेतेपदाच्या अपेक्षेमुळे अनेक नेते आक्रमक भूमिका घेण्यापासून दूर राहत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर, सत्ताधारी पक्षाला प्रभावी आव्हान देणारी ठोस आणि सातत्यपूर्ण विरोधी भूमिका कुठेच दिसत नाही. लोकशाहीत विरोधक हे केवळ टीका करणारे नसून, पर्यायी धोरणे मांडणारे, जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारे आणि सत्तेला जबाबदार धरणारे घटक असतात. मात्र, सध्याच्या परिस्थितीत विरोधक स्वतःच्या राजकीय समीकरणांत गुंतलेले दिसतात.

इतिहासात जवाहरलाल नेहरू यांनीही विरोधी आवाजाचे महत्त्व अधोरेखित केले होते. सशक्त विरोधक नसतील तर सत्तेचा समतोल बिघडतो आणि लोकशाही कमकुवत होते, हे त्यांनी स्पष्टपणे मांडले होते. आज महाराष्ट्रात त्याच विचारांची अधिक गरज भासते. एकंदरीत, राज्यात विरोधी पक्षाची भूमिका केवळ अस्तित्वापुरती मर्यादित न राहता प्रभावी आणि जबाबदार असणे गरजेचे आहे. अन्यथा “विरोधक शोधा” अशी जाहिरात देण्याची वेळ येईल, ही भावना केवळ उपरोधिक न राहता वास्तव ठरू शकते. लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर सत्तेसोबतच विरोधकांनीही आपल्या भूमिकेचे गांभीर्य ओळखणे अत्यावश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥

ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरण; राज्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता...

## कमी दाबाचा पट्टा सक्रिय; विदर्भ-मराठवाड्यात येलो अलर्ट, वादळी पावसाचा अंदाज

महाईन्यूज । मुंबई

**राज्यात उष्णतेचा तडाखा कायम असतानाच आता पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. मध्य प्रदेशापासून विदर्भ, मराठवाडा ते कोमोरीन परिसरापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भ आणि दक्षिण मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.**




### पूर्वमोसमी पावसाची चाहूल, राज्यात बदलते हवामान

मध्य प्रदेश ते कोमोरीन भागापर्यंत सक्रिय झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्रात पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज असून काही जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अरबी समुद्राकडून येणारे आर्द्र वारे आणि किनारपट्टीलगतचे चक्राकार वारे यामुळे कोकणात दमट हवामान राहणार आहे, तर अंतर्गत भागांत वादळी पावसाची शक्यता आहे. आगामी काही दिवसांत हवामानात आणखी बदल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

अरबी समुद्राकडून येणारे आर्द्र वारे आणि केरळ किनारपट्टीलगत सक्रिय चक्राकार वाऱ्यांच्या प्रभावामुळे राज्यात ढगाळ हवामान निर्माण झाले आहे. कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामान राहण्याचा अंदाज असून, विदर्भ व दक्षिण मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उर्वरित भागात अंशतः ढगाळ वातावरणासह उन्हाचा चटका कायम राहणार आहे.

दरम्यान, मन्नारचा आखात व श्रीलंका परिसरातील चक्राकार वाऱ्यांमुळे नैऋत्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत. या प्रणालीचा परिणाम पुढील काही दिवस राज्यातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. शनिवारी देशातील उच्चांकी तापमान राजस्थानातील फालोदी येथे ४४.८ अंश सेल्सिअस नोंदले गेले. महाराष्ट्रात वाशीम येथे ४२.८ अंश तापमानाची नोंद झाली. जळगाव, अकोला येथे ४२ अंश, तर वर्धा, भंडारा, चंद्रपूर, बुलडाणा, परभणी आदी ठिकाणी ४० अंशांहून अधिक तापमान राहिले. महाबळेश्वर येथे नीचांकी १८ अंश तापमान नोंदविण्यात आले.

# भोंदू खरात प्रकरणी रूपाली चाकणकर यांची चौकशी सुरू

महाईन्यूज । नाशिक

**भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे वादात अडकलेल्या रूपाली चाकणकर यांची नाशिक एसआयटीसमोर चौकशी सुरू झाली आहे. आज सकाळी चाकणकर यांनी पुण्याहून नाशिकला जात तपास यंत्रणेसमोर हजेरी लावली. रूपाली चाकणकर या वकिलांसोबत चौकशीसाठी पोहचल्या.**





### SIT चौकशीत रूपाली चाकणकर

भोंदू अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकर यांची नाशिक येथे SITकडून सखोल चौकशी सुरू झाली असून आर्थिक व्यवहार, संस्थेतील भूमिका आणि पदाच्या गैरवापरासंदर्भात तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे. चाकणकर यांनी तपास यंत्रणेसमोर हजेरी लावत पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे. दरम्यान, या प्रकरणात मंत्र्यांचा कथित सहभाग, विरोधकांचे आरोप-प्रत्यारोप आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रश्नांमुळे प्रकरणाला राजकीय रंग चढला असून पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले.

महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून चाकणकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला होता असा आरोप आहे. त्याशिवाय खरात यांच्या शिवानिका संस्थाच्या विश्वस्तपदी रूपाली चाकणकर होत्या. त्यामुळे आर्थिक व्यवहारांबाबतही चाकणकर यांची चौकशी करण्यात येत आहे.

एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते या रूपाली चाकणकर यांची चौकशी करत आहेत. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे. या चौकशीला हजर होण्यापूर्वी चाकणकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आज जो एसआयटीचा तपास सुरू आहे, त्यांना काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. ती देण्यासाठी मी आली आहे. तपासात माझे पूर्णपणे सहकार्य राहील. तपास यंत्रणेला जी काही मदत लागेल ती निश्चितपणे केली जाईल असं त्यांनी म्हटलं आहे.

तर खरात प्रकरणात राज्याच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश आहे. या मंत्र्यांची हकालपट्टी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवणार असून भोंदू खरातकडून सगळी माहिती गोळा करून त्याचा एन्काउंटर केला जाईल असा दावा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. मात्र ४ मंत्र्यांची नावे आहेत, त्यांचा यात सहभाग असेल तर नाना पटोलेंनी ती नावे मुख्यमंत्र्यांकडे द्यावीत किंवा जाहीर करावीत. याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. मात्र ठोकताळ्यावर अंदाजपणे नावे सांगणे आणि प्रत्यक्ष गुन्ह्यात सहभागी असणे हा भाग वेगळा आहे. त्यामुळे ही नावे मुख्यमंत्र्यांना द्यावीत. माध्यमांसमोर जायचे असेल तर ती नावे उघडही करावी असा टोला मंत्री संजय शिरसाट यांनी लगावला आहे.

दरम्यान, तपास यंत्रणेत पतसंस्थांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी होईल परंतु ज्या राजकीय नेत्यांचा या प्रकरणात सहभाग आहे त्यांची चौकशी कोण करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. माझ्याकडे आलेली सगळी माहिती, त्यातील आर्थिक गैरव्यवहार हे सगळे एसआयटीकडे पाठवले तरीही त्याची चौकशी झाली नाही असा आरोप दमानिया यांनी केला आहे.

# चर्चा म्हणजे शरणागती नव्हे!

## इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा अमेरिकेला थेट इशारा; इराण आणि अमेरिका तणाव शिगेला

**महाईन्यूज । इराण**

**इस्लामिक प्राजसत्ताक इराणने आज पाकिस्तानी मध्यस्थांमार्फत युद्ध संपवण्याकरता अमेरिकेला प्रस्ताव पाठवला असल्याचं वृत्त सरकारी वृत्तसंस्था IRNA ने दिलं आहे. यावरून इराणने अमेरिकेला इशारा दिला आहे. प्रस्ताव पाठवला म्हणजे शरण आलो आहे, असं नाही, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी अमेरिकेला थेट इशारा देत अस म्हटलं आहे.**



### इराणच्या मसुद्यात विशिष्ट मागण्यांचा समावेश

इराणच्या मसुद्यात अमेरिकेने इराणवरील निर्बंध उठवावेत आणि इराणी बंदरावरील नाकेबंदी संपुष्टात आणावी अशा विशिष्ट मागण्यांचा समावेश आहे. इतकंच नव्हे तर या प्रस्तावात अमेरिकेने या प्रदेशात आपेल सैन्य मागे घ्यावे आणि सर्व शत्रुत्व थांबवावे असा आग्रह धरण्यात आला आहे, यात लेबनॉनमधील इस्रायलचे युद्ध संपवण्याचा मागणीचाही समावेश आहे.

सार्वभौमत्त्वाच्या तत्वांना सध्याच्या भू राजकीय परिस्थितीशी जोडून पेझेश्कियन यांनी यावर जोर दिला की इस्लामिक प्राजसत्ताक सामर्थ्यशाली स्थानासाठी कटिबद्ध आहे. त्यांनी नमूद केलं की, कोणत्याही राजनैतिक संबंधांमागील मुख्य उद्दिष्ट लोकांची सुरक्षा आणि समृद्धी सुनिश्चित करणं हे आहे.”

इराणी जनतेच्या हक्कांचे रक्षण करणे आणि दृढ शक्तीने राष्ट्रीय हितांचे संरक्षण करणे हे उद्दिष्ट आहे, असं पेझेश्कियान पुढे म्हणाले. दरम्यान, या उच्चस्तरीय वक्तव्याबरोबरच एक औपचारिक राजनैतिक पाऊलही उचलण्यात आलंय. इराणने पाकिस्तानमार्फत प्रादेशिक संघर्ष कमी करण्याच्या अमेरिकेच्या प्रस्तावावर आपली प्रतिक्रिया सादर केली, असं इराणच्या सरकारी माध्यमांनी रविवारी जाहीर केलं.

अल जझिराच्या वृत्तानुसार तेहरानने तयार केलेल्या आणि यापूर्वीच समोर आलेल्या १४ कमी योजनेमुळे या चर्चांची गरज अधोरेखित झाली आहे. या वृत्तवाहिनीने म्हटलंय की इराणी रणनीती तीन मुख्य टप्प्यांमध्ये विभागलेली आहे. यामुळे तात्पुरत्या युद्धविरामाचे युद्धाच्या संपूर्ण समाप्तीमध्ये रुपांतर करण्यासाठी ३० दिवसांच्या टप्प्याचा समावेश आहे. ही चौकट अमेरिकेने यापूर्वी मांडलेल्या नऊ कलमी शांतता योजनेला थेट प्रत्युत्तर म्हणून सादर करण्यात आली होती. यामुळे पश्चिम आशियातील भू-राजकीय समीकरणांमध्ये नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, इराणकडून मांडण्यात आलेली ही भूमिका आगामी काळात अमेरिका आणि प्रादेशिक देशांमधील राजनैतिक चर्चांचा केंद्रबिंदू ठरू शकते.

# पंतप्रधान मोदींची तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांना खास ऑफर

**महाईन्यूज । तेलंगणा**

**तेलंगणाच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी हैदराबादमध्ये सुमारे ९४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी केंद्र सरकारच्या विकास धोरणांवर भाष्य करत तेलंगणासाठीही मोठ्या प्रमाणात सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.**



### गुजरातला जेवढे दिले, तेवढे मी तेलंगणालाही द्यायला तयार

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, “रेवंतजी म्हणाले होते की आपण राजकीय भाष्य करणार नाही, त्यामुळे मीही करणार नाही. मात्र एक अराजकीय गोष्ट सांगतो, केंद्राने गेल्या दहा वर्षांत गुजरातला जेवढे दिले, तेवढे मी तेलंगणालाही द्यायला तयार आहे. पण तसे केल्यास, तेलंगणाला सध्या मिळणारी मदत अर्धी होईल.” यानंतर त्यांनी हसतच, “म्हणून माझ्यासोबत येणेच उत्तम,” असे म्हणत उपस्थितांमध्ये हास्याची लहर निर्माण केली.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी तेलंगणा राज्यासाठी “तेलंगणा नमुना” विकसित करण्यास केंद्र सरकारने मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्याला उत्तर देताना मोदी यांनी हलक्या फुलक्या शैलीत राजकीय टिप्पणी केली.

यावेळी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी राज्याच्या आर्थिक प्रगतीबाबत मोठे लक्ष्य समोर ठेवले. त्यांनी सांगितले की, २०३४ पर्यंत तेलंगणाला एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे. देशाच्या लोकसंख्येत तेलंगणाचा वाटा ३ टक्क्यांपेक्षा कमी असला, तरी भारताच्या ३० लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेच्या स्वप्नात १० टक्के योगदान देण्याचा राज्याचा निर्धार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थिती आणि जागतिक ऊर्जा संकटावरही भाष्य केले. नागरिकांनी पेट्रोलियम उत्पादनांचा संयमाने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. आयात केलेल्या पेट्रो उत्पादनांचा गरजेनुसार वापर केल्यास परकीय चलनाची बचत होईल आणि जागतिक संघर्षांचे आर्थिक परिणामही कमी होतील, असे त्यांनी सांगितले. मोदी यांनी तेलंगणाच्या विकासासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाहीही यावेळी दिली. राज्यातील सिंचन, माहिती तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी काळात देशाच्या प्रगतीमध्ये तेलंगणाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचेही मोदी म्हणाले.


# क्रिती सेनॉनचा बॉलीवूडबद्दल मोठा खुलासा

बॉलीवूडची लोकप्रिय व स्टायलिश अभिनेत्री क्रिती सेनॉन हिने अभिनयाच्या जोरावर सिनेविश्वामध्ये स्वतंत्र ओळख निर्माण केली. बॉलीवूडची कोणतीही पार्श्वभूमी नसताना क्रितीने कलेमध्ये सातत्य दाखवीत एक दशक प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. हिरोपंती या चित्रपटातून टायगर श्रॉफसह बॉलीवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या क्रितीला २०२३ मध्ये राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये क्रिती सेनॉन हिने राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतरच्या भावना आणि बॉलीवूडमध्ये आजही असलेले घराणेशाही यांवर परखड भाष्य केले. अभिनेत्री क्रिती सेनॉन हिला मीमी या चित्रपटासाठी २०२३ साली सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. GQ ला दिलेल्या एका मुलाखतीत हा क्षण क्रितीसाठी अत्यंत अभिमानाचा आणि करिअरमधील सर्वांत सुखद अनुभव देणारा असल्याचे तिने सांगितले. क्रिती सेनॉन म्हणाली की, माझ्या करिअरमधील सर्वांत महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे 'मीमी' आणि त्याला मिळालेले अमाप प्रेम. कारण- हा असा पहिलाच प्रकल्प होता, ज्याची संपूर्ण जबाबदारी मी माझ्या खांद्यावर घेतली होती. आम्ही कोरोना महामारीच्या अत्यंत अनिश्चित काळातून जात होतो. चित्रपट मुळात चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार होता; परंतु त्याऐवजी तो ओटीटीवर प्रदर्शित झाला. मात्र, चित्रपटाला प्रेक्षकांनी प्रचंड प्रेम दिले आणि प्रमुख भूमिकेसाठी मला 'राष्ट्रीय पुरस्कार' मिळाला. हा माझ्या कारकिर्दीतील सर्वांत गौरवशाली क्षणांपैकी एक ठरला, अशा भावना क्रिती सेनॉन हिने व्यक्त केल्या. चित्रपटसृष्टीमधील यश हे अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर हळूहळू मिळत जाते. मी अधिक जाणीवपूर्वक निवड करीत जोखीम स्वीकारली. मी प्रत्येक संधी स्वतःच्या मेहनतीने मिळवली आहे; मला काहीही आयते मिळालेले नाही, असे मत क्रितीने व्यक्त केले. त्याचबरोबर बॉलीवूडमध्ये पुरुषप्रधान पद्धत असून, अभिनेत्यांना अभिनेत्रींपेक्षा अधिक मानधन दिले जाते. महिला कलाकारांना आजही विषमतेचा सामना करावा लागतो, असे क्रितीने सांगितले.



# अक्षय खन्नाचा प्रॉडक्शन टीमसोबत जेवणावरुन वाद

धुरंधर चित्रपटामध्ये रहमान नावाच्या 'रहमान डकैत'ची भूमिका साकारल्यानंतर अभिनेता अक्षय खन्ना सध्या प्रचंड चर्चेत आहे. पडद्यावर आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घालणारा अक्षय खन्ना खऱ्या आयुष्यात त्याच्या शांत आणि गंभीर स्वभावासाठी ओळखला जातो. मात्र, एका चित्रपटाच्या सेटवर अक्षयला एकदा इतका राग आला की त्याने चक्क सेटवरील सदस्याची शाळा घेतली. अमित बहल यांनी एका मुलाखतीत सांगितले की, एकदा एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अक्षय खन्ना आणि मुख्य कलाकार एका मोठ्या हॉटेलमध्ये थांबले होते. मात्र, त्याच चित्रपटातील एक छोटा सह-कलाकार दुसऱ्या हॉटेलमध्ये थांबला होता. एके दिवशी तो सह-कलाकार लंचसाठी मुख्य टीम थांबलेल्या हॉटेलमध्ये आला. त्याने जेवणासाठी प्लेट उचलली आणि पहिला घास घेणार इतक्यात प्रॉडक्शन टीममधील एका सदस्याने त्याला अडवले. हा सदस्य निर्मात्याचा नातेवाईक होता. त्या सदस्याने त्या कलाकाराला सर्वांसमोर अडवलं आणि म्हणाला की, "सर, तुम्ही इथले पाहुणे नाही आहात, त्यामुळे इथे जेवू शकत नाही." हे ऐकून त्या कलाकाराला खूप वाईट वाटले आणि त्याने आपली प्लेट बाजूला ठेवली व तो एका कोपऱ्यात जाऊन बसला. अक्षय खन्ना हे सर्व लांबून पाहत होता. एरवी शांत राहणाऱ्या अक्षयचा पारा चढला आणि त्याने तात्काळ तिथे आवाज उठवला. अक्षय निर्मात्यावर ओरडत म्हणाला, "कोणताही चित्रपट तुमच्याकडे किती ताटं आहेत किंवा किती जेवण आहे यावर बनत नाही, तर तो लोकांच्या आशीर्वादाने बनतो." या एका वाक्याने अक्षयने निर्मात्याची बोलती बंद केली. अक्षय खन्ना आपल्या सह-कलाकारांचा किती आदर करतो, हे या प्रसंगातून सर्वांना कळून आलं.



# अविका गौर हिने भारत देश कायमचा सोडला

अभिनय क्षेत्रातील अनेक कलाकार हे नंतर परदेशांमध्ये स्थायिक होत आहेत. चित्रपटातील शूटिंगपुरते ते भारतामध्ये परत येतात आणि परदेशात वास्तव्य करीत असतात. त्यामध्ये बॉलीवूडमधील अनेक कलाकारांसह आता मालिकाविश्वातील कलाकारांचाही समावेश होत आहे. 'बालिका वधू' मालिकेतून घराघरात पोहोचलेल्या अत्यंत लोकप्रिय अभिनेत्रीनेदेखील देश सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ती परदेशामध्ये स्वतःचे घर घेऊन राहत आहे. मात्र, तिने भारत आणि राहत घर का सोडले, असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला होता. अभिनेत्रीने याबाबत स्वतः खुलासा केला आहे.' बालिका वधू या मालिकेतून लोकप्रिय झालेली अभिनेत्री अविका गौर हिने देश सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तिने भारत सोडून पतीसह परदेशामध्ये राहण्यास सुरुवात केली आहे. अविका गौर ही पती मिलिंद चांदवानीसह बँकॉकमध्ये शिफ्ट झाली आहे. अविकाने करिअर आणि लोकप्रियतेच्या शिखरावर असताना देश सोडण्याचा निर्णय घेतल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. तसेच तिच्या चाहत्यांसाठी तो मोठा धक्का मानला जात आहे. अविकाने २१ जून २०२५ रोजी तिचा प्रियकर मिलिंद चांदवानी याच्याशी विवाह केला. लग्नापूर्वी ते सात वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. या जोडीने आता बँकॉकमध्ये घर खरेदी केले असून, दोघेही कायमचे बँकॉकमध्ये राहण्यास गेले आहेत. अविकाने स्पष्ट केले की, अविकाने हे सांगितले की, ती कायमस्वरूपी बँकॉकला स्थायिक झाली असली तरी ती भारतामध्ये काम सुरू ठेवणार आहे.



# डुडाला नमवून गुकेशचे पुनरागमन

## ब्लिट्झ विभागात डळमळीत सुरुवात केली

**महाईन्यूज । वॉर्सा**



**विश्वविजेता डी. गुकेशने ब्लिट्झ विभागात डळमळीत सुऊवात केली असली, तरी येथील सुपर रॅपिड आणि ब्लिट्झच्या नवव्या फेरीत पोलंडच्या जान-क्रिस्तोफ डुडावर एकतर्फी विजय मिळवून त्याने आपली स्थिती सुधारली. रॅपिड विभागात शक्य असलेल्या 18 पैकी नऊ गुण मिळविल्यानंतर गुकेशने सुऊवातीच्या नऊ ब्लिट्झ फेऱ्यांमधून आणखी चार गुण मिळवले आहेत आणि ब्लिट्झ स्पर्धेच्या मध्यावर तो 13 गुणांवर पोहोचला आहे.**

ब्लिट्झच्या पहिल्या दिवशी अत्यंत सामान्य कामगिरी करूनही अमेरिकेच्या हान्स मोके नीमनने गुणतालिकेत आपली आघाडी कायम ठेवली आहे. 9 पैकी 3.5 गुण मिळवून हा अमेरिकन खेळाडू 16.5 गुणांवर पोहोचला आहे आणि आता तो त्याचा देशबांधव वेस्ली सोपेक्षा अर्ध्या गुणाने पुढे आहे. तिसरा अमेरिकन खेळाडू फॅबियानो काऊआना आणि स्लोव्हेनियन खेळाडू व्लादिमीर फेडोसेव्ह हे प्रत्येकी 15 गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत, तर गुकेश त्यांच्यापेक्षा दोन गुणांनी मागे आहे.

फ्रेंच जोडी फिरोझा अलीरेझा आणि मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्ह हे डुडासोबत 12.5 गुणांसह सहाव्या स्थानावर आहेत, तर उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह 12 गुणांसह नवव्या स्थानावर आहे. पोलिश खेळाडू राडोस्लाव्ह वोजटाझाक 10 गुणांवर आहे. गुकेशने स्पर्धेच्या तिसऱ्या दिवसाची सुऊवात वोजटाझाक आणि अलीरेझा यांच्याविऊद्ध दोन पराभवांनी केली आणि त्यानंतर काऊआना व सिंदारोव्ह यांच्याविऊद्ध आणखी दोन पराभव पत्करले. रॅपिड गेममध्ये पराभूत झाल्यानंतर सिंदारोव्हने गुकेशविऊद्ध एक विजय मिळवला. पण गुकेशसाठी दिवसाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्पर्धेत आघाडीवर असलेल्या हान्स निमनवर मिळवलेला प्रभावी विजय हा राहिला. त्यानंतर या भारतीय खेळाडूने जान-क्रिस्तोफ डुडावर एकतर्फी विजय मिळवून दिवसाची सांगता केली.



# ६,६,६,६,६,६.. उर्विल पटेलने मोडला एबी डिव्हिलियर्सचा रेकॉर्ड!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**चेन्नई सुपर किंग्स संघाने आपल्या घरच्या मैदानावर खेळताना लखनौ सुपर जायंट्स संघाला पराभवाची धूळ चारली आहे. चेपॉकच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स संघाला विजयासाठी २०४ धावांचे आव्हान मिळाले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना युवा फलंदाज उर्विल पटेल हा लखनौच्या विजयाचा हिरो ठरला. अवघ्या १३ चेंडूत अर्धशतक पूर्ण करत त्याने या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावलं.**



त्याने अवघ्या २३ चेंडूत वेगवान ६५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत.

चेन्नईला हा सामना जिंकण्यासाठी वेगवान सुरुवातीची गरज होती. ही सुरुवात उर्विल पटेलने करून दिली. आधी आवेश खानच्या षटकात षटकारांची हॅट्रिक केली. त्यानंतर दिग्वेश राठीच्या षटकात लागोपाठ षटकार खेचून त्याने लखनौच्या गोलंदाजांवर दबाव टाकला. यादम्यान त्याला युवराज सिंगचा वेगवान अर्धशतकाचा रेकॉर्ड मोडण्याची संधी होती. पण हा रेकॉर्ड थोडक्यात हुकला. पण १३ चेंडूत अर्धशतक पूर्ण करून त्याने आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावलं. या रेकॉर्डमध्ये त्याने यशस्वी जैस्वालची बरोबरी केली. जैस्वालने देखील १३ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना लखनौ सुपर जायंट्स संघाकडून जोस इंग्लिसने सर्वाधिक ८५ धावांची खेळी केली. तर शाहबाझ अहमदने नाबाद ४३ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या २०३ धावांवर पोहोचवली. या धावांचा पाठलाग करताना चेन्नईकडून उर्विल पटेलने सर्वाधिक ६५ धावा केल्या. तर ऋतुराज गायकवाडने ४२ धावांची खेळी करून चेन्नईला ५ गडी राखून विजय मिळवून दिला.

## उर्विल पटेलने मोडला एबी डिव्हिलियर्सचा रेकॉर्ड

आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात आतापर्यंत अनेक आक्रमक फलंदाज होऊन गेले आहेत. पण उर्विल पटेलने असं काही करून दाखवलं आहे, जे याआधी कोणालाच जमलेलं नाही. उर्विल पटेल हा आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील पहिलाच असा फलंदाज ठरला आहे, ज्याने आपल्या डावातील सुरुवातीच्या ८ चेंडूंमध्ये ६ षटकार खेचले आहेत. यासह उर्विल पटेल हा आयपीएल स्पर्धेतील सुरुवातीच्या १० चेंडूत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने १० चेंडूत ४१ धावा केल्या. याआधी एबी डिव्हिलियर्सने २०१५ मध्ये मुंबई इंडियन्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात १० चेंडूत ४१ धावा केल्या होत्या.

उर्विल पटेलच्या या तडाखेबाज खेळीमुळे स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साहाचं वातावरण निर्माण झालं होतं. त्याच्या आक्रमक फलंदाजीसमोर लखनौच्या गोलंदाजांना कोणतीही रणनीती यशस्वी ठरत नव्हती. पॉवरप्लेच्या षटकांमध्येच चेन्नईने सामन्यावर आपली मजबूत पकड निर्माण केली होती. उर्विलने खेळलेल्या आकर्षक फटक्यांमध्ये लाँग ऑन आणि मिडविकेटच्या दिशेने मारलेले षटकार विशेष चर्चेत राहिले. त्याच्या या खेळीमुळे चेन्नईच्या धावगतीत सातत्याने वाढ होत गेली. ऋतुराज गायकवाडने देखील शांत आणि संयमी फलंदाजी करत उर्विलला उत्तम साथ दिली. दोघांमधील भागीदारीमुळे लखनौ संघ पूर्णपणे दबावाखाली गेला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। सोमवार ।
दि. 11 मे 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# पीसीएमसी शाळांमध्ये गणवेश खरेदी तातडीने सुरू करा

## भाऊसाहेब भोईर यांची मागणी; स्थायी समितीच्या मंजुरीनंतर प्रक्रिया सुरू करण्याचे आवाहन

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**गणवेश खरेदीप्रक्रिया आता सुरू केल्यास पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळेल. त्यामुळे स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर प्रक्रिया सुरू करून गणवेशांची खरेदी करण्यात यावी, असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.**



महापालिकेच्या बालवाड्यांसह प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शालेय व पीटी गणवेश, स्वेटर, सॉक्स, रेनकोट, दप्तर, वेस्टकोट, हातरुमाल, हेअर बॅण्ड, रिबीन, टाय आदी साहित्य सोलापूर येथील जगदंबा संस्थेकडून खरेदी करण्याचा ठराव दोन एप्रिलच्या शिक्षण समितीने मंजूर केला आहे. त्याला स्थायी समितीने 22 एप्रिलला मान्यता दिली आहे. त्यानुसार गणवेश खरेदीप्रक्रिया सुरू करण्यात यावी.

शासनाद्वारे निश्चित केलेल्या दरानुसार उत्तम दर्जाचे साहित्य मिळणार आहे. विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचे काम सोलापूर येथील श्री जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था मर्यादित या अंध व दिव्यांगांसाठी कार्यरत संस्थेमार्फत केले जाणार आहे. तिच्या माध्यमातून अनेक अंध, दिव्यांग नागरिकांना प्रवाहात आणून रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे त्या संस्थेमार्फत साहित्य घेतल्यास महापालिकेच्या नावलौकीकात भर पडेल, अशी शिफारस विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.

### सूचक, अनुमोदक नावात दुरुस्ती

स्थायी समिती सभेच्या 22 एप्रिलच्या वृत्तांत्तामध्ये दुरुस्ती करावी, असे पत्र सभापतींना दिले आहे. कार्यपत्रिका क्रमांक 12, विषय क्रमांक 7, ठराव क्रमांक 366 यावर सूचक संदीप वाघेरे व अनुमोदक विकास साने यांची नावे आहेत. नाव टाकताना स्थायी समिती सभेतील सभासदांची नावे अनुक्रमे दाखल केली आहेत. ही दुरुस्ती करण्यात आली आहे, असे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले. यासंदर्भातील सुधारित नोंद अधिकृत अभिलेखामध्ये समाविष्ट करण्यात आली.

# पिंपरीत ८व्या मजल्यावरून पडून ३४ वर्षीय महिलेचा मृत्यू

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**मावळ तालुक्यातील कातवी परिसरात असलेल्या व्हीटीपी अर्बन लाइफ सोसायटीमध्ये शनिवारी दुपारी घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली. इमारतीच्या आठव्या मजल्यावरून पडल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकारामुळे रहिवाशांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली.**



दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

प्रतिभा मनीष शंकर (वय ३४, रा. व्हीटीपी अर्बन लाइफ सोसायटी, कातवी, ता. मावळ, जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या आपल्या कुटुंबासह सोसायटीमध्ये राहत होत्या. शनिवारी दुपारी अचानक त्या इमारतीच्या आठव्या मजल्यावरून खाली पडल्याची घटना घडली. परिसरातील नागरिकांनी मोठा आवाज ऐकल्यानंतर बाहेर धाव घेतली असता, त्या गंभीर जखमी अवस्थेत आढळून आल्या. या घटनेमुळे काही काळ परिसरात भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच सोसायटीतील नागरिक आणि सुरक्षा रक्षकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या प्रतिभा शंकर यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, नातेवाईक आणि रहिवाशांमध्ये शोककळा पसरली आहे.

तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात ही घटना अपघाती स्वरूपाची असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, नेमके कारण काय होते, त्या कशा पडल्या, याबाबत पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास केला जात आहे. घटनास्थळावरील परिस्थिती, सीसीटीव्ही फुटेज, तसेच परिसरातील नागरिकांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणात कोणताही संशयास्पद प्रकार आहे का, याचाही तपास पोलिस करत आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर सोसायटी परिसरात मोठी गर्दी झाली होती. अनेक रहिवाशांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. प्रतिभा शंकर या शांत आणि मनमिळावू स्वभावाच्या असल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे संपूर्ण सोसायटीत हळहळ व्यक्त होत आहे. विशेषतः लहान मुलांसमोर ही घटना घडल्याने अनेकजण मानसिक धक्क्यात असल्याचेही सांगण्यात येत आहे.

### उंच इमारतींमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजनांची गरज

अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी उंच इमारतींमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजनांची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. बाल्कनी आणि कॉमन एरिया परिसरात सुरक्षाविषयक नियम अधिक काटेकोरपणे पाळणे आवश्यक असल्याची चर्चा रहिवाशांमध्ये सुरू आहे. तसेच, मानसिक तणाव, एकटेपणा किंवा इतर कारणांमुळे अशा घटना घडू नयेत यासाठी समाजात जागरूकता निर्माण करण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये अपघाताचा धोका वाढला

## प्रशासनाकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना; नागरिकांकडून तात्काळ दुरुस्तीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक रस्त्यांवर स्ट्रॉम वॉटर लाईन, ड्रेनेज चेंबर आणि गटारांची झाकणे तुटलेली अथवा उघडी असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी थेट संबंधित असलेल्या या गंभीर समस्येकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत मार्ग, वर्दळीचे चौक तसेच रहिवासी भागांमध्येही अशी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.**





> काही ठिकाणी दुरुस्ती केली तरी दगड किंवा फांद्या ठेवून धोक्याचा इशारा दिला जातो; मात्र बॅरिगेट्स, रिफ्लेक्ट होणारे रीडिंग लावणे आवश्यक असते. काही ठिकाणी तर दुर्घटना घडू नये म्हणून ठेवलेल्या फांद्यादेखील बाजूला गेल्याने तेथून प्रवास करणाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.
>
> – अदित्य खैरनार, स्थानिक नागरिक

एखाद्या ठिकाणी रस्त्यावर खड्डा पडला किंवा चेंबरचे झाकण तुटले की त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याऐवजी प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना केल्या जात असल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या, दगड, लोखंडी बॅरिकेड किंवा प्लास्टिकचे अडथळे ठेवून नागरिकांना सावध करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, हे उपाय केवळ दिखाऊ ठरत असून प्रत्यक्षात धोका कायम असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. अनेक दिवस तसेच आठवड्यांपर्यंत ही उघडी चेंबर्स आणि तुटलेली झाकणे दुरुस्त न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे अनेक वळणांवर किंवा गर्दीच्या ठिकाणीच उघडी चेंबर्स असल्याने वाहनचालकांना अचानक ब्रेक मारावे लागत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होण्याबरोबरच अपघाताचाही धोका वाढत आहे. रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे ही उघडी चेंबर्स सहज लक्षात येत नाहीत. पावसाळ्यात तर पाण्याखाली झाकले गेलेले खड्डे आणि चेंबर्स अधिक धोकादायक ठरतात. दुचाकीस्वार, सायकलस्वार तसेच ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

काही ठिकाणी नागरिकांनी स्वतः पुढाकार घेत तुटलेल्या झाकणांभोवती दोरखंड बांधणे किंवा फांद्या रोवून इशारा देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून तातडीने कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेबाबत नाराजी वाढत आहे. रस्त्यावर उघडी चेंबर्स, तुटलेली झाकणे आणि त्याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे भविष्यात मोठा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. एखादी जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त प्रश्नही नागरिक विचारत आहेत. शहरातील धोकादायक ठिकाणांची तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पीसीएमसीची कारवाई; 23 मोटारपंप जप्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील तापमानाचा पारा चाळीशी जवळ गेल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. शहरासह उपनगरात अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नळाला थेट विद्युत मोटारपंप लावून पाणी खेचणाऱ्या पिंपळे निलखमध्ये 14, थेरगाव येथील पवारनगर, पडवळनगरमध्ये 9 अशा एकूण 23 विद्युत मोटारपंप जप्त करण्यात आल आहेत.**




## फौजदारी कारवाईकडे दुर्लक्ष

नळजोडास थेट विद्युत मोटार पंप लावून पाणी खेचण्याचे प्रमाण शहरात अधिक आहे. वरच्या मजल्यावर तसेच,गच्चीवरील टाकीत पाणी भरण्यासाठी अशा प्रकारे मोटार पंप लावले जातात. त्या काही हाऊसिंग सोसायट्यांचाही समावेश आहे. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांना पाणी मिळत नाही. त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. नळजोडास थेट विद्युत मोटारपंप लावणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा पाणीपुरवठा विभागाकडून दिला जातो. मात्र, केवळ मोटारपंप जप्त केले जातात. मात्र, फौजदारी कारवाई केली जात नाही. त्यामुळे कारवाईनंतरही काही जणांकडून पुन्हा मोटारपंप लावून पाणी खेचले जात असल्याचे आढळून आले आहे.

चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, काळेवाडी, प्राधिकरण, काळेवाडी, किवळे, वाल्हेकरवाडीसह शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा विस्कळीत असल्याच्या तक्रारी येत आहेत. विस्कळीत, अपुरा, अवेळी पाणीपुरवठयाच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. नागरिकांनी गाड्या धुणे, अंगणामध्ये, रस्त्यावर पिण्याचे पाणी मारणे, जिने धुणे, झाडे व बागेस पाणी घालणे टाळावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने वारंवार करण्यात येत आहे.

नागरिक नळजोडास थेट विद्युत पंप लावून मोठ्या प्रमाणात पाणी खेचतात. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांना पुरेसा प्रमाणात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यावर आळा बसविण्यासाठी तसेच, तक्रारीचे निरसन करण्यासाठी पिंपळे निलख परिसरात 14, थेरगाव येथील पवारनगर व पडवळनगरमध्ये 9 अशा एकूण 23 मोटार पंप जप्त करण्यात आल्या आहेत. अशाच प्रकारे शहरातील इतर भागातही मोटारपंप लावून पाणी खेचणाऱ्या नागरिकांच्या मोटारी जप्त करण्यात येणार आहेत. नळजोडास थेट विद्युत मोटारपंप लावू नये. कोणत्याही खासगी प्लंबरद्वारे अनधिकृत नळजोड घेऊ नये. वॉशिंग सेंटरचालकांनी पिण्याचे पाणी वापर केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

शहरात वॉशिंग सेंटरची संख्या मोठी आहे. यामधील अनेक वॉशिंग सेंटरचालक बोअरवेलचे पाणी वापरतात. तर, काही व्यावसायिक नळजोड घेऊन वाहने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरत आहे. मात्र, काही वॉशिंग सेंटर चालक अनधिकृत नळजोड घेऊन पिण्याचे पाणी वापरत असल्याच्या तक्रारी आहेत. अशा वॉशिंग सेंटरचे पाणीपुरवठा विभागाच्या वतीने सर्वेक्षण करून कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

नागरिकांनी वाहने धुणे, अंगणामध्ये, रस्त्यावर पिण्याचे पाणी मारणे टाळावे. जास्त पाणी मिळावे, म्हणून काही नागरिक महापालिकेच्या नळजोडास थेट विद्युत मोटार पंप लावून पाणी खेचतात. अशा नागरिकांवर कारवाई सुरू केली असून, पिंपळे निलख आणि थेरगाव परिसरात 23 मोटारपंप जप्त करण्यात आल्या आहेत. ती कारवाई संपूर्ण शहरात करण्यात येत आहे.

**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

# 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.



## ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

**+91 9890613333 | +91 9373073077**

**pgosm05@gmail.com** **www.priyadarshanischoolmoshi.in**